नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६८ Issue - 168 | वार शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०२५ Blow- Friday Date 7 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# १,८०० कोटींचे बाजारभाव असणारी जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी

## पार्थ पवारांचा पाय खोलात, सही असलेला महत्वाचा दस्तावेज सापडला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटींचे बाजारभाव असणारी जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या खरेदी व्यवहारात शासनाची १५२ कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे खरेदी व्यवहारात केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरण्यात आले आहे. यात सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे. यावरून राजकीय राळ उठली असून, अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधी पक्ष करत आहेत. याप्रकरणी विरोधकांनी मोठ्या प्रमाणावर हल्लाबोल करत महायुती सरकारलाही धारेवरती धरलं आहे. अशातच या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी २ जणांवर गुन्हे दाखल केले आहे. मात्र, यामध्ये पार्थ पवार यांचं नाव नसल्याचं समोर आलं आहे. तक्रारदाराने ३ जणांवर सुमारे ६ कोटींचा मुद्रांक शुल्क न भरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पोस्ट लिहून काही सवाल उपस्थित केले आहेत.

### मुद्रांक विभाग अन् पोलिसांकडून वाचवण्याचा प्रयत्न? विरोधकांचा आरोप

### मुख्यमंत्र्यांनी दिले चौकशीचे आदेश

कोरेगाव पार्कमधील जमीन व्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपूत्र पार्थ पवार यांचं नाव जमीन घोटाळा प्रकरणी चर्चेत आलं आहे. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. तर या प्रकरणी सह जिल्हा निबंधक वर्ग १ संतोष अशोक हिंगाणे यांनी प्रशासकीय चौकशी करून तक्रार दिली आहे. या प्रकरणी ४२०, ४०९, ३३४ आणि भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) ३१६ (५) अंतर्गत गुन्हे दाखल केले आहे. ३ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहे. या प्रकरणात पार्थ पवार यांचं नाव समोर आलं आहे. पण सध्या फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, अमेडिया इंटरप्राइजेस एल. एल. पी. चे भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील, जमीन विक्रीबाबत कुलमुख्यातपत्र असणारी महिला शीतल तेजवानी आणि निलंबित सह दुय्यम निबंधक आर. बी. तारु यांच्यावर गुन्हे दाखल केले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास केला जात आहे, अशी माहिती बावधान पोलिसांनी दिली.

सुषमा अंधारे यांनी या जमिन प्रकरणातील एक कागदपत्र शेअर केले आहे, त्यावरती पार्थ पवारांनी सही केल्याचं दिसून येत आहे. त्याबाबत सवाल उपस्थित करत सुषमा अंधारेंनी म्हटलंय की, ''पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल होण्यापासून वाचवण्याचा मुंद्रांक विभाग आणि पोलिस प्रयत्न करत आहेत का ? एकच दस्त ९०१८/२२५ नोंदणीत वापरलेला असताना आणि विशेष म्हणजे जिल्हा इंडस्ट्री बोर्डाच्या मुद्रांक माफीच्या ठरावावर पार्थ पवारांची सही आहे हे चौकशी अहवालात नमूद असूनही पार्थ पवारांचं नाव घेणं यंत्रणांनी का टाळलं? असे सवाल सुषमा अंधारेंनी उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे अमेडा कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी आहे आणि दिग्वीजय फक्त एक टक्का भागीदार आहेत. मात्र पार्थ यांच्या ऐवजी दिग्वीजय यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सामाजित कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील सोशल मिडीया एक्सवरती पोस्ट करत म्हटलंय, ऋखठ झाला पण त्यातही ीलरा? पार्थ अजित पवारचे नाव नाही आणि कंपनीचे पण नाव नाही? का? ह्यातून सुद्धा वाचवण्याची तयारी ? बास करा राजकारण. चौकशी करा आणि शिक्षा द्या. ह्या वेळी जी समिती स्थापन होईल, त्यात फक्त शासकीय अधिकारी नाही, जनतेतून सुद्धा प्रतिनिधी हवेत. मी हे प्रतिनिधित्व करायला तयार आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी पोस्ट करत म्हटलंय की, कोरेगाव पार्क प्रकरणात गुन्हा दाखल तर झाला पण या मध्ये पार्थ पवार अथवा त्यांच्या कंपनीचे नाव साफ साफ वगळण्यात आले! म्हणजे सरकारचे जादूचे प्रयोग सुरू झाले आहेत.. ते ही प्रकरण उघडकीस आल्याच्या अवघ्या २४ तासात.. असं नाही चालणार मुख्यमंत्री ऊर्शीत्रवपरींळी म होदय.. या विषयाची चौकशी करणारे अधिकारी विकास खार्गे निश्चितच स्वच्छ प्रतिमेचे आहेत. पण प्रकरणात गुंतलेली नावे पाहता यामध्ये कडक बाण्याचे एक निवृत्त न्यायमूर्तीही सरकारने द्यायला हवेत.

# बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६४.४६ टक्के मतदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा : बिहार विधानसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडलं आहे. पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यातील १२१ जागांवर मतदान पार पडलं. बिहारमध्ये गेल्या निवडणुकीच्या तुलनेत पहिल्या टप्प्यात मतदान वाढलं आहे. जन सुराज पक्षाचे नेते प्रशांत किशोर यांनी वाढलेलं मतदान लक्षात घेता मोठा दावा केला आहे. प्रशांत किशोर यांच्या दाव्यानुसार गेल्या निवडणुकीपेक्षा यावेळी झालेलं अधिक मतदान हे दाखवतं की जनतेला बदल हवा आहे. नवी व्यवस्था येत आहे.

### मतदानाचा टक्का वाढला; सत्ताधारी- विरोधकांची धाकधूक वाढली

बिहारमध्ये गेल्या निवडणुकीवेळी पहिल्या टप्प्यात १२१ जागांवर ५५.८१ टक्के मतदान झालं होतं. यावेळी सायंकाळी ५ वाजता मतदानाची आकडेवारी ६०.१३ टक्क्यांवर पोहोचली आहे. तर, नव्या माहितीनुसार बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६४.४६ टक्के मतदान झालं आहे. मतदानासाठी महिलांनी रांगा लावल्याचं पाहायला मिळालं. प्रशांत किशोर यांचा पक्ष यावेळी पूर्ण ताकदीनं निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. त्यांच्या पक्षाला किती जागांवर विजय मिळतो ते पाहावं लागेल.

दुसरीकडे महागठबंधनच्या नेत्यांनी या वाढलेल्या मतदानासंदर्भात वेगवेगळे दावे केले आहेत. भाकप (मार्क्सवादी) चे महासचिव एमए बेबी यांनी गुरुवारी म्हटलं की महागठबंधनच्या प्रचाराला बिहारच्या लोकांचा प्रतिसाद मिळाला आहे. तरुण नफरत आणि द्वेषाच्या राजकारणाला स्वीकारणार नाहीत, असं ते म्हणाले.

सीपीआयचे महासचिव एमए बेबी यांनी म्हटलं की महागठबंधननं लोकांच्या कल्याणाचे, उपजिविकेचे मुद्दे मांडले आहेत. बेबी म्हणाले की, महागठबंधनच्या प्रचाराला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आम्ही लोकांच्या कल्याण आणि उपजिविकेच्या मुद्यांना समोर आणण्यात यशस्वी ठरलो आहेत, असंही ते म्हणाले. विकासशील इन्सान पार्टीचे मुकेश साहनी यांनी पहिल्या टप्प्यातील मतदानाची टक्केवारी पाहून बिहारमध्ये बदलाची लाट असल्याचं म्हटलं. बंपर मतदान झालं आहे, अशी माहिती मिळाली आहे. आता पूर्ण बिहारमध्ये बदल होईल आणि महागठबंधनचं सरकार बनेल, अशी आशा असल्याचं मुकेश साहनी म्हणाले.

दरम्यान, प्रशांत किशोर यांनी काही दिवसांपूर्वी त्यांचा पक्ष १५० पेक्षा अधिक जागा जिंकेल किंवा १० पेक्षा कमी जागा जिंकेल असं वक्तव्य केलं होतं. याशिवाय किशोर यांनी बिहारला तिसरा पर्याय हवा आहे, असंही म्हटलं. बिहार विधानसभेच्या राहिलेल्या १२२ जागांसाठी ११ नोव्हेंबरला मतदान होईल. तर, मतमोजणी १४ नोव्हेंबरला होणार आहे. बिहारचे मतदार यावेळी कोणत्या आघाडीला सत्तेत बसवणार हे पाहावं लागेल.

# मुंबईत लोकल ट्रेनच्या धडकेत ३ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंब्रा रेल्वे अपघात प्रकरणी रेल्वे कर्मचाऱ्यांनी आंदोलन केलं आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा फटका ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांना बसला असून २० मिनिटांपासून ट्रेन दादरला थांबून आहेत. त्यामुळे, मुलुंड आणि ठाणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी आहे. गर्दीमुळे चार प्रवासी लोकल ट्रॅकवरुन जात असताना लोकलची धडक बसल्याने खाली पडल्याची धक्कादायक घटना घडली असून तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. ट्रेनमधून खाली पडलेल्या प्रवाशांना जे.जे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मस्जिद आणि सीएसएमटी रेल्वे मार्गावर सँडहर्स्ट रोडजवळ हा अपघात झाला. ट्रॅकवरुन प्रवासी चालत होते, ३ पुरुष आणि १ महिला ट्रॅकवरुन चालत असताना अचानक लोकल मागून आली, त्यात त्यांना धडक बसली. अंबरनाथला जाणारी लोकल ट्रेन होती, अशी माहिती आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा फटका ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांना बसला आहे. उडचढ वरुन रेल्वे वाहतूक विस्कळीत झाल्याने कामावरुन घरी जाण्यासाठी निघालेल्या चाकरमान्यांचे हाल होत असून रेल्वे स्थानकांवर मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मुंब्रा अपघात प्रकरणी अभियंत्यांवर कारवाई केल्यानंतर रेल्वे कर्मचारी आक्रमक झाले असून त्यांन आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. मुंब्रा येथे झालेल्या अपघातानंतर लोहमार्ग पोलिसांनी दोन अभियंत्यांवर गुन्हे दाखल केले, आणि त्याच्या विरोधात रेल्वे कर्मचारी संघटनेनं आज आंदोलन केलं.




हे आंदोलन आता मागे घेतलं असलं तरी त्याचा परिणाम संध्याकाळपासूनच दिसायला लागला. लोकलचं वेळापत्रक विस्कळीत झालं असून, अनेक गाड्या उशिराने धावत आहेत, तर काही रद्द करण्यात आल्या आहेत. दादर, ठाणे, कुरळा, सीएसएमटी अशा प्रमुख स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली आहे. प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.





जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या. फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.



प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### शासनाची फसवणूक

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटींचे बाजारभाव असणारी जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या खरेदी व्यवहारात शासनाची १५२ कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे खरेदी व्यवहारात केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरण्यात आले आहे. यात सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे. यावरून राजकीय राळ उठली असून, अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधी पक्ष करत आहेत. याप्रकरणी विरोधकांनी मोठ्या प्रमाणावर हल्लाबोल करत महायुती सरकारलाही धारेवरती धरलं आहे. अशातच या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी २ जणांवर गुन्हे दाखल केले आहे. मात्र, यामध्ये पार्थ पवार यांचं नाव नसल्याचं समोर आलं आहे. तक्रारदाराने ३ जणांवर सुमारे ६ कोटींचा मुद्रांक शुल्क न भरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पोस्ट लिहून काही सवाल उपस्थित केले आहेत. सुषमा अंधारे यांनी या जमिन प्रकरणातील एक कागदपत्र शेअर केले आहे, त्यावरती पार्थ पवारांनी सही केल्याचं दिसून येत आहे. त्याबाबत सवाल उपस्थित करत सुषमा अंधारेंनी म्हटलंय की, ''पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल होण्यापासून वाचवण्याचा मुंद्रांक विभाग आणि पोलिस प्रयत्न करत आहेत का ? एकच दस्त ९०१८/२२५ नोंदणीत वापरलेला असताना आणि विशेष म्हणजे जिल्हा इंडस्ट्री बोर्डाच्या मुद्रांक माफीच्या ठरावावर पार्थ पवारांची सही आहे हे चौकशी अहवालात नमूद असूनही पार्थ पवारांचं नाव घेणं यंत्रणांनी का टाळलं? असे सवाल सुषमा अंधारेंनी उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे अमेडा कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी आहे आणि दिग्वीजय फक्त एक टक्का भागीदार आहेत. मात्र पार्थ यांच्या ऐवजी दिग्वीजय यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ज्ञानक्रांतीचा पहिला दिवस : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विद्यार्थी कसा असावा? याचं प्रतीक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कितीही संकटे आली, कितीही अन्याय-अत्याचार झाले तरीही आपलं चारित्र्य न गमवता जिद्द आणि चिकाटीने त्यांना तोंड देणे हे एक सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याचे लक्षण आणि त्या विद्यार्थी दशेला परिपूर्ण न्याय देतात ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ७ नोव्हेंबर हा दिवस भारतीय समाज जीवनात, विशेषतः विद्यार्थ्यांच्या जगात एक ऐतिहासिक व प्रेरणादायी दिवस म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन हा केवळ एक दिवस नाही, तर ज्ञान, समानता आणि स्वाभिमानाच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल आहे. ७ नोव्हेंबर १९०० रोजी बाबासाहेबांनी साताऱ्यातील प्रतापसिंग प्राथमिक शाळेत आपला शैक्षणिक प्रवास सुरू केला. शाळेकरिता वळणारी बारक्या भिवाची ती पावलं म्हणजे साधीसुधी नव्हती तर ती एक नव्या युगाची सुरवात होती. त्यावेळी त्यांचे नांव भिवा असे होते. या शाळेच्या रजिस्टरला १९१४ त्या क्रमांकासमोर आजही बाल भिवाची स्वाक्षरी असून हा ऐतिहासिक दस्तऐवज शाळा प्रशासनाने जपून ठेवला आहे. शाळेच्या वर्गाबाहेर बसून शिकणारा विद्यार्थी, पाण्याच्या एका घोटाला तरसलेला विद्यार्थी तर अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हा प्रवास म्हणजे साधासुधा प्रवास नाही बरं कां ! हे टाकीचे घाव सोसल्यानंतर या विद्यार्थ्याने भारतीय संविधानाची मूळ रचना न्याय, सक्त आणि बंधुता या तत्त्वावर कां केली? याचं प्रकर्षाने जाणीव होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन म्हणजे एका अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगांतराची चाहूल म्हटली पाहिजे, कारण बाबासाहेबांचे पाऊल शाळेत पडल्यामुळेच ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे-वंचितांचे उद्धारकर्तेही झाले. एका अशा समाजातून आलेल्या या बालकाने, जिथे शिक्षण म्हणजे केवळ वरच्या जातींचा अधिकार मानला जायचा, तिथे प्रवेश घेऊन इतिहास घडवला. त्या छोट्या कृतीतून एका नव्या युगाचा उदय झाला, ज्ञानक्रांतीचा आरंभ! हा दिवस म्हणजे त्या संघर्षमय प्रवासाच्या पहिल्या पानाचा स्मरणदिन आणि परिवर्तनाची सुरुवात. डॉ. आंबेडकरांनी त्या शाळेच्या दारातून प्रवेश घेतला आणि पुढे शिक्षणाच्या शिखरावर जाऊन संपूर्ण भारताला अंध:कारातून प्रकाशाकडे नेले. डॉ. आंबेडकरांनी जगाला एक अमूल्य मंत्र दिला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. त्यांच्यासाठी शिक्षण हे फक्त पदवी मिळवण्याचं साधन नव्हतं; तर ते स्वातंत्र्याचं आणि आत्मसन्मानाचं शस्त्र होतं. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचं मूलभूत साधन बनवलं. कारण समाजातली विषमता तोडायची असेल, तर ती केवळ कायद्याने नाही तर शिक्षणानेच शक्य आहे.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

आजच्या तरुण पिढीने हे स्मरण ठेवणं आवश्यक आहे की, बाबासाहेबांसाठी शिक्षण म्हणजे केवळ करिअर नव्हे, तर चरित्रनिर्मितीचा मार्ग होता. आजच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी प्रवेश दिन फक्त साजरा न करता, त्यामागचा आशय समजून घेणं गरजेचं आहे. शाळेच्या दारात पाऊल टाकणं म्हणजे केवळ शिक्षणात प्रवेश नाही, तर चेतनेच्या प्रवासाची सुरुवात आहे. तर प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला विचारावे की, मी शिक्षण केवळ नोकरीसाठी घेतोय की समाजासाठी काही करणार आहे? मी ज्ञानाचा उपयोग माझ्या आणि इतरांच्या उन्नतीसाठी करतोय का? बाबासाहेबांच्या शिकण्याच्या भुकेला मी जिवंत ठेवतोय का? हे प्रश्नच विद्यार्थी प्रवेश दिन साजरा करण्यामागचं खरं तत्त्वज्ञान आहे.

आज डिजिटल युगात माहितीच्या सागरात आपण विहार करतोय, पण ज्ञानाचा दीप हरवतोय. डॉ. आंबेडकरांचे तत्त्व आजही तेवढेच लागू आहेत. शिकणं म्हणजे प्रश्न विचारणं आणि प्रश्न विचारणं म्हणजे विचारशक्ती जिवंत ठेवणं. आज समाजात पुन्हा अन्याय, असमानता आणि अंधश्रद्धेचं वातावरण वाढत आहे. अशावेळी बाबासाहेबांचं शिक्षणतत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन करतात. ७ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की, प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात समाजबदलाची किल्ली आहे. बाबासाहेबांचा शैक्षणिक प्रवास म्हणजे प्रत्येक दीन, दलित, शोषित, उपेक्षित व्यक्तीसाठी प्रेरणेचा झरा आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकं उघडू नयेत, तर मनंही उघडावी. कारण जेव्हा मन शिक्षित होतं, तेव्हाच समाज प्रकाशमान होतो.

बाबासाहेब शाळेत गेल्यामुळेच ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून जगभर गौरव होतो. त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकार ही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली, म्हणूनच बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासला कूस बदलावयास लावणारी क्रांतिकारी घटना ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते. त्यांनी आपला हा विद्या व्यासंग आयुष्याच्या शेवटपर्यंत जपला. आजचा प्रत्येक विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी तयार होणे काळाची गरज आहे. शिक्षण हेच एकमेव उन्नतीचे साधन आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या कठोर परिश्रमाची जाण सर्व विद्यार्थांना होण्यासाठी २७ ऑक्टोबर २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खास शासन निर्णय जारी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिन म्हणजे ७ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी विद्यार्थी दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा असे निर्देशित केले आहे. तसेच या शासन निर्णयामध्ये विद्यार्थी दिवस या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर विविध कार्यक्रम जसे निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन इत्यादि उपक्रम आयोजित करण्याचे सूचनाही आहेत. त्यामुळे सर्वांनी खूप शिका, विचार करा आणि परिवर्तन घडवा. तुमच्या मेहनतीमुळे आणि समर्पणामुळे तुम्ही मोठे यश मिळवावे, हीच सदिच्छा. सर्वांना विद्यार्थी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# वर्ल्ड कप विजेत्या टीम इंडियातील महाराष्ट्राच्या लाडक्या लेकींना प्रत्येकी २.२५ कोटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिला विश्वचषक २०२५ जिंकून टीम इंडियाने इतिहास रचला आहे. या विजयानंतर, प्रत्येक खेळाडूचा सन्मान केला जात आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकार ने एक महत्त्वाची घोषणा देखील केली आहे. महाराष्ट्र सरकार जेमिमा रॉड्रिग्ज, स्मृती मानधना आणि राधा यादव यांना बक्षिस रोख रक्कम देऊन सन्मान केला जाईल अशी घोषणा केली होती. या तिघांनीही भारताच्या महिला विश्वचषक २०२५ च्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

जेमिमाने सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध नाबाद १२७ धावा केल्या. स्पर्धेत स्मृती भारतासाठी सर्वाधिक धावा करणारी फलंदाज होती. राधा सेमीफायनल आणि फायनल दोन्हीमध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये होती. महाराष्ट्र मंत्रिमंडळाने राज्यातील क्रिकेटपटूंना बक्षीस देण्याचा निर्णय घेतला. स्मृती, जेमिमा आणि राधा या प्रत्येकीला २.२५ कोटी देणार असल्याची घोषणा केली होती. मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनाही २२.५ लाख रुपये मिळतील.

डीवाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना झाला. सलामीवीर म्हणून स्मृतीने ५८ चेंडूत ४५ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर जेमिमाने ३७ चेंडूत २४ धावा केल्या. भारताने पहिल्यांदाच महिला विश्वचषक जिंकला आहे. याव्यतिरिक्त, ईस्ट बंगाल क्लब दीप्ती शर्मा आणि रिचा घोष यांना सन्मानित करणार आहे. भारताच्या पहिल्या महिला विश्वचषक विजयात दोघांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. दीप्तीला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. दीप्ती सात हंगाम बंगालसाठी खेळली. महिला विश्वचषक २०२५ च्या नऊ सामन्यांमध्ये तिने २२ विकेट्स घेतल्या, २१५ धावा केल्या आणि तीन अर्धशतके ठोकली. तिने अंतिम सामन्यात ५८ धावांची खेळी केली. रिचाने ३९.१६ च्या सरासरीने आणि १३३.५२ च्या स्ट्राईक रेटने २३५ धावा केल्या. एकत्रितपणे, त्यांनी स्पर्धेत सर्वाधिक १२ षटकार मारले. क्लबचे अध्यक्ष मुरली लाल लोहिया यांनी दोघांनाही पत्र लिहून लवकरच सन्मान समारंभ आयोजित करण्यास सांगितले. याशिवाय रेणुका सिंग ठाकुरला हिमाचल प्रदेश सरकारकडून १ कोटी रुपये आणि क्रांती गौडला मध्यप्रदेश सरकारकडून १ कोटी रुपये देण्यात येणार आहे.

# दगाबाजी करणाऱ्या सरकारला धडा शिकवा : उध्दव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/अमर जाधव : शेतकऱ्यांची फसवणूक करून वारंवार मतं घेतली पाहिजेत, मात्र शेतकऱ्यांना कुठल्याही पद्धतीने मदत द्यायची नाही असा उद्देश सरकारचा दिसून आहे. त्यामुळेच 'दगाबाज रे' आंदोलन सुरू आहे. सरकार कडून मदत जाहीर करून फसवणूक केली जात आहे, सरकारने मदत फक्त जाहीर केली तरी आधार मिळत नाही. पूर्वी शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन देऊन फसवण्यात आले आहे. त्यामुळे आम्ही 'दगाबाज रे' आंदोलनासह असंख्य शेतकऱ्यांनी हक्कासाठी रस्त्यावर उतरले. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी लढा उभारला असून सरकारकडून मदत मिळावी यासाठी ठिकठिकाणी दौरे करत आहेत.



औसा तालुक्यातील भुसणी येथील शेतकऱ्यांनी ठाकरे साहेबांच्या संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ठाकरे साहेबांनी ठाकरे यांच्या समोर गैरसोयीचा व तक्रारींचा पाढा वाचला.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी विविध समस्यांबाबत मांडणी केली. शेतकऱ्यांनी वेळोवेळी शिक्षण फिस माफीचा प्रश्न मांडला. ठाकरे साहेबांनी सांगितले की, शेतकरी राजा जर सुखी समाधानी असेल तर आपण सर्व सुखी समाधानी आहोत.

सरकारने शेतकऱ्यांना शासन मदतीस पूर्णपणे उदासीनता दाखवली आहे. अशा सरकारला उलथून टाकले पाहिजे.

यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार ओमराजे निंबाळकर , आमदार कैलास पाटील, आमदार मिलिंद नार्वेकर माजी आ. दिनकर माने, जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, बालाजी रेड्डी, नामदेव चाळक, जयश्री उटगे, दिनेश जावळे शिवसेनेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## वांद्रे पूर्व येथे उच्च न्यायालय संकुलाची पायाभरणी व कोनशीलेचे अनावरण

# न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक : सरन्यायाधीश भूषण गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : न्यायालयीन इमारती या केवळ भव्य नसाव्यात, तर त्या न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे मूर्त रूप असाव्यात. त्या प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेश सुलभ करणाऱ्या ठराव्यात, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाचा पायाभरणी आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहत परिसरात पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले तसेच न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई म्हणाले की, न्यायालयीन इमारतींचे बांधकाम केवळ वास्तुशास्त्राचे उदाहरण नसून, त्या देशातील लोकशाही मूल्ये आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवणाऱ्या संस्था आहेत. ही इमारत फक्त वास्तू नाही, तर न्याय आणि पारदर्शकतेचे मंदिर आहे. येथे नागरिक, वकील आणि न्यायाधीश या सर्वांना समसमान सुविधा मिळतील. प्रत्येक प्रकल्पामध्ये पर्यावरणपूरक आणि हरित वास्तुकलेचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्र नेहमीच पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर राहिला आहे. राज्य शासनाकडून न्यायव्यवस्थेच्या गरजांनुसार आधुनिक इमारती, तंत्रज्ञान आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. हे संकुल राज्याच्या न्यायसंस्थेचे प्रतीक असलेले एक आधुनिक आणि वैभवशाली बांधकाम असेल.

सरन्यायाधीश गवई यांनी राज्यातील नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील न्यायालयीन संकुलांचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, या सर्व प्रकल्पांमुळे न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता, गती आणि सुलभता वाढेल. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील उच्च न्यायालयीन न्यायाधीश, वकील संघटना व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याचेही कौतुक केले. न्यायदान प्रणाली कार्यक्षम होण्यासाठी न्यायाधीश आणि वकिलांनी परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे. दोन्ही घटक मिळूनच न्यायव्यवस्थेचे सुव्यवस्थापन शक्य होते, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य न्यायमूर्ती गवई यांनी महाराष्ट्र शासनाचे, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित समित्यांचे कौतुक करताना सांगितले की, गतिशील नेतृत्वामुळे न्यायालयीन पायाभूत सुविधा विक्रमी वेगाने उभ्या राहत आहेत. या इमारती नागरिकांसाठी न्याय, समानता आणि बंधुता या राज्यघटनेतील तत्त्वांचे प्रतीक ठरतील.

**लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब असलेली भव्य न्यायालयीन इमारत उभारूया – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उच्च न्यायालयाची ही इमारत केवळ सुंदरच नव्हे, तर देशातील सर्वात जलद आणि स्मार्ट इमारत म्हणून ओळखली जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून ही इमारत पूर्णपणे 'एआय-सक्षम' असेल. भविष्यात उच्च न्यायालयाची ही इमारत देशातील इतर न्यायालयांसाठी आदर्श ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ही इमारत लोकशाही मूल्यांचे वैभव असावी, राजेशाही दिमाखाचे नसावी, तसेच ही इमारत जनतेला न्याय मिळण्याचे प्रतीक ठरावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्या न्यायालयीन इमारतीच्या रचनेबाबत वास्तुशिल्पकार हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडे व्यक्त केली. उच्च न्यायालयातील अनेक सरकारी वकीलांना पुरेशी जागा आणि आवश्यक सोयी सुविधांचा समावेश असावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**न्याय म्हणजे जनकल्याणाची साधना – मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर**

न्याय म्हणजे केवळ कायद्याचा अंमल नव्हे, तर ती लोककल्याणाची साधना आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी केले. न्यायाची खरी ओळख म्हणजे लोकांच्या हितासाठी कार्य करणे. न्यायालये केवळ प्रकरणे सोडविण्याची ठिकाणे नसून, ती समाजाच्या नैतिकतेचे आणि सामूहिक मूल्यांचे प्रतिबिंब आहेत. न्याय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी देण्याचा आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रयत्न आहे.

ते म्हणाले की, न्यायसंस्थेची जबाबदारी केवळ आपल्या देशापुरती मर्यादित नसावी. जगभरातील लोकांनी आपल्या न्यायव्यवस्थेतील प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचे कौतुक करावे. समाजातील सर्व घटकांच्या सहकार्याने आपण न्यायाच्या नव्या उंचीवर पोहोचू शकतो. या मार्गावर समाजाचा विश्वास हीच खरी प्रेरणा आहे, असेही त्यांनी सांगितले.

**न्यायव्यवस्था सर्वसामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षात उच्च न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या कामाला प्रारंभ होत आहे, ही बाब अत्यंत आनंदाची असून न्यायव्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि सर्वसामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी, यासाठी हे पाऊल ऐतिहासिक ठरणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. न्यायालयीन विषयांबाबत शासनाचा निर्णय क्षणार्धात घेतला जातो, कारण शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळावा हेच शासनाचे ध्येय आहे. ही नवी वास्तू केवळ न्यायालयाची इमारत नाही, तर ती न्यायाच्या परंपरेचा आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. पुढील शंभर वर्षांचा विचार करून या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. मुंबईच्या कायदा आणि न्यायाच्या इतिहासात ही इमारत एक नवा अध्याय लिहिणार आहे. भविष्यात या वास्तूच्या उभारणीसाठी आणि न्यायव्यवस्थेच्या गरजांसाठी शासन कोणतीही तडजोड करणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



**महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील नवे पर्व – उपमुख्यमंत्री अजित पवार**

आजचा दिवस हा महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा, अभिमानाचा आणि ऐतिहासिक आहे. हे उद्घाटन उच्च न्यायालयाच्या १५० वर्षांच्या वैभवशाली इतिहासातील नव्या पर्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, न्याय हा लोकशाहीचा मजबूत पाया आहे. प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळण्याचा अधिकार आहे. राज्य शासनाने न्यायप्रविष्ट प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. कोल्हापूर येथे स्थापन करण्यात आलेला सर्किट बेंच लवकरच कायम बेंचमध्ये रूपांतरित होईल, अशी खात्री त्यांनी यावेळी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला सामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवण्याचा प्रयत्न शासन सतत करत आहे. स्वतंत्र भारतात न्यायव्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. या नवीन संकुलासाठी आवश्यक असणारा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पुर्वतयारीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

## प्रशासनाला दिल्या विविध सूचना; पायाभूत सुविधा, समस्या-अडचणीविषयी मान्यवरांनी मांडल्या मागण्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पुर्वतयारी चा आढावा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.राम दास आठवले यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे घेतला.येत्या ६ डिसेंबर २०२५ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येणाऱ्या लाखो भीम अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा; सुरक्षा; आरोग्य; स्वच्छता आदी कामाच्या पूर्वतयारीचा आढावा घेणारी बैठक ना. रामदास आठवले यांनी घेतली.यावेळी जिल्हा अधिकारी आचल गोयल; बार्टीचे महासंचालक सुनील वारे; राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विश्वनाथ इंदिसे; मुंबई मनपा चे सपकाळ; एम एम आर डी ए; रेल्वे; पोलिस आदी विभागांचे अधिकारी;पूज्य बौद्ध भदंत डॉ राहुल बोधी महाथेरो आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चैत्यभूमी येथे असणारा स्तूप जीर्ण झाला असून त्या ठिकाणी दीक्षाभूमी सारखा भव्य स्तूप उभारला पाहिजे. मुंबईतील विधानभवन च्या धर्ती-वर चैत्यभूमी चा स्तूप आणि पाठीमागे चैत्यभूमी ची इमारत उभारून विकास केला पाहिजे. चैत्यभूमी जवळच्या सेल्फी पॉईंटपासून इंदुमिलपर्यंत समुद्रा-तून रस्ता बनवला पाहिजे आदी सूचना ना.रामदास आठवले यांनी केल्या.

चैत्यभूमी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना भोजनदान करण्यात येणार आहे. किमान १ लाख अनुयायांना भोजनदान करण्यात येणार आहे. महापरिनिर्वाण दिनी पावसाची शक्यता असल्यास अपतिव्यवस्थपन ची यंत्रणा तयार ठेवण्याबाबत चर्चा झाली. अनुयायांना सुरक्षा पुरविणे अन्नदान आरोग्य आदी सुविधा आणि ट्रॅफिक रेल्वे पुरविण्याबाबत आदी कामांच्या पूर्वततयारीचा आढावा पर. रामदास आठवले यांनी घेतला.यावेळी अनेक रिपाइं चे नेते उपस्थित होते.

---

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदा कार्तिकी यात्रा २०२५ मोठ्या उत्साहात पार पडली. यात्रेच्या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

भाविकांच्या सेवेसाठी चहा व पाणी वाटप केंद्रे, उपवास खिचडी वाटप, ला-इव्ह दर्शन व्यवस्था, डिजिटल सूचना फलक व बोर्ड, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, दर्शन रांगेत सुरक्षा रक्षकांची नेमणूक, तसेच वैद्यकीय सुविधा अशा सर्व सोयी-सुविधांचा समावेश होता.

या सर्व सोयींमुळे भाविकांनी अत्यंत आनंदाने आणि समाधानाने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातांचे दर्शन घेतले. अशी माहिती प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

कार्तिकी यात्रा २०२५ दरम्यान एकूण ११ दिवसांच्या कालावधीत भाविकांची खाली-लप्रमाणे नोंद झाली आहे -

पददर्शन भाविक संख्या : २५४५३५

मुखदर्शन भाविक संख्या : ३३७३३४

एकूण दर्शन घेतलेले भाविक : ५९१८६९

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे व प्रशासनच्या मदतीने यात्रा यशस्वीपणे पार पडली. अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे.

**- श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

---

## गुरुनानक यांची मानवतावादी शिकवण आचरणात आणावी : मलकप्पा भरमशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : गुरुनानक यांनी अंधश्रद्धा रूढी परंपरा दांभिकतेवर प्रहार करून सत्य, विनयशीलता, शांतता आदी मानवता धर्माची शिकवण समाजाला दिली. त्यांची हीच शिकवण आचरणात आणली तर समाज परिवर्तनात गती येईल असे मत मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुनानक जयंती साजरी करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, नागरिकांनी पूजा विधी पेक्षा प्रेम, सत्य, नम्रता, क्षमा व दयाभाव अंगीकारला पाहिजे. स्त्री पुरुष समानता अंगीकारली पाहिजे, जाती भेदास विरोध दर्शविला पाहिजे श्रमाला प्रतिष्ठा दिली पाहिजे.




**कल्याणशेट्टी महाविद्यालयात गुरुनानक जयंती निमित्त कार्यक्रम**

प्रारंभी गुरुनानक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी केले, आभार प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा रविंद्र कालिबत्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

---

# आर्थिक सशक्तीकरण अभियानला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे नागसेन विद्यालय, उस्मानपुरा छत्रपती संभाजी नगर येथे आर्थिक सशक्तीकरण अभियानावर ५ नोव्हेंबर २०२५ ला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रसिद्ध उद्योगपती भगवान गवई म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर सुद्धा आपण अनेक क्षेत्रात सक्षम होऊ शकलेलो नाही. करिता सामाजिक, सांस्कृतिक, अर्थ व राजकीय क्षेत्रात सशक्तिकरण घडवून आणण्यासाठी ते समाज जीवनात पूर्णवेळ कार्यरत आहेत. ऐक्याने लढत असताना समाजाला पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. आपण बहुसंख्यांक असताना सुद्धा आपले स्वतंत्र बँक नाही म्हणून लॉर्ड बुद्धा फायनान्स लिमिटेड ची उभारणी सुरू आहे. एन बी एफ सी सह प्रोग्रेसिव कौन्सिल ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ची निर्मिती करून बेरोजगारांना उद्योग धंद्याकडे वळविण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. ज्यातून आपण ही उद्योगपती होऊ शकतो असा विश्वास निर्माण केला जाईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या संचालिका सूर्यकांता गाडे मॅडम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, शाळा, महाविद्यालय, शिक्षण, आरक्षण, नोकऱ्या बंद पडत असताना शासनकर्ती जमात होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आर्थिक सशक्तीकरणाला आपण प्राधान्य दिले पाहिजे.

याप्रसंगी फुले आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजात पैशाची कमी नाही तर कमी आहे, ती दूरदृष्टीची! समाजात अनेकांनी अनेकांची फसवणूक केली असल्याने विश्वास कुणावर ठेवावा? हा समाजासमोर गहण प्रश्न आहे. म्हणून समाजासमोर कुठलीही योजना सादर करताना विश्वास संपादन करण्यासाठी इत्यंभूत माहिती दिली पाहिजे जेणेकरून लोक उत्स्फूर्तपणे आ-पला सहभाग नोंदवतील. आपण व्यक्त केलेल्या सर्व बाबीचे आ-चरण करू शकलो तर जनतेचा निश्चित विश्वास बसेल आणि आ-पणास आर्थिक क्षेत्रात एनबीएफसी सह लार्ड बुद्धा फायनान्स लिमिटेड सारख्या बँकांची उभारणी करता येईल. ज्यामुळे आपले आदर्श म हापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात जास्त शिक्षण अर्थशास्त्रात घेतलेले असताना त्यांचे अनुयायी दारिद्र्यात का? हा कलंक पुसून काढता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रान-डे, गांधी आणि जिना या चर्चेत म्हणाले होते की, आपण चालवत असलेल्या पक्ष, संघटना आणि संस्था आपल्या उत्कर्षासाठी सक्षम ठरत नसतील तर उपयोगात आणले जाणारे विचार, सवयी आणि मार्ग बदलले पाहिजेत. याचाच एक भाग म्हणून पर्यायी व्यवस्थेच्या अनुषंगाने भारतीय समाज संघाच्या माध्यमातून सध्या प्रयत्न केले जात आहेत. तरी जनतेने या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा जेणेकरून अपना नोट - अपना विकास और अपना वोट - अपना राज यप्रमाणे समाजाच्या अर्थबळावर समाजाच्या उत्कर्षासाठी कार्य करता येईल.

या प्रसंगी उत्तर प्रदेशातील प्रसिद्ध उद्योगपती ॲड. ओमप्रकाश मौर्या व सामाजिक कार्यकर्ते साहेब सिंग धनगर भाई यांनी आर्थिक सशक्तिकरण व उद्योगधंद्यातील नव्या संधी यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राध्यापक विलास कटारे तर सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. व्ही एच कांबळे डॉ. यशवंत कांबळे, पत्रकार बाबा गाडे, शैलेंद्र मिसाळ, प्रा. विलास कटारे असे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

शब्दांकन : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र.

संपर्क : ९४२१६७८६२८, ८९८३०८२१२८.

---

**जातो माघारी पंढरीनाथा तुझे दर्शन झाले आता...**

# गोपाळपूर काल्यानी कार्तिक वारीची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

> **चातुर्मासाची समाप्ती**
>
> **कार्तिकी यात्रेतील गोपाळपूर खाल्यानंतर चातुमर्सिांची समाप्ती होत असल्याने आषाढी यात्रेपासून म्हणजेच तब्बल चार महिने चातुर्मासांसाठी शहरातील विविध मठ व धर्मशाळे मधून वास्तव्यास असलेले वारकऱ्यांना देखील आता आपापल्या गावाकडे परत जाण्याचे वेध लागलेले आहेत. वारकऱ्यांनी गावाकडे परत जाण्यासाठी सामानाची आवरावरही करण्याची लगबग दिसत होती.**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी वारीची सांगता आज बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर गोपाळकाला होऊन झाली गोड झाला, गोपाळांनी गोड केला च्या जयघोषात अविही श्रीकृष्ण नगरी म्हणजेच गोपाळपूर नगरी हजारो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली व कार्तिक यात्रेच्या सोहळ्याची परंपरेप्रमाणे प्राण्यांच्या उत्साहाने बुधवार दिनांक पाच सांगता करण्यात आली. यावेळी गोप-ाळपूर ग्रामपंचायतच्या वतीने वारकऱ्यांना जास्तीत जास्त सेवा सुविधा उपलब्ध होण्यात यासाठी जाहीर तयारी करण्यात आलेली होती. दरम्यान या कार्याच्या उत्साहाबरोबरच खऱ्या अर्थाने चातुमर्सिाची देखील समाप्ती होत असल्याने गेल्या चार महिन्यापासून खास शतुर मासासाठी येथे मुक्कामास असलेल्या वारकऱ्यांना देखील आपापल्या गावाकडे परत जाण्याचे आता वेद लागलेली आ-हेत.

कार्तिकी एकादशीचा सोहळा पार पडल्यानंतर भाविकांना वेद लागतात ते पौर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोप-ाळपूर तालुका पंढरपूर येथे होणाऱ्या गोपाळकाल्याची त्यानुसार बुधवार दिनांक पाच पौर्णिमेच्या दिवशी पहाटेपासूनच विविध संतांच्या दिंड्या चंद्रभागा नदीचे स्नान करून गोपाळपूरकडे काल्यासाठी रवाना होत होत्या. गोपाळपूर मधील भगवान श्रीकृष्ण मंदिरात काल्याचे किर्तन झाले व गोपाळपूर येथील वातावरण आज दिवसभर भक्तिमय होते.

दरम्यान पहाटेपासूनच एकामागून एक अशा विविध संतांच्या छोट्या-मोठ्या दिंड्या, व पालख्या विठ्ठल नामाच्या गजर करीत गोपाळपुरात दाखल होत होत्या,



गोपाळकाल्याच्या सोहळ्यासाठी आ-लेली भाविक मोठ्या श्रद्धेने श्री गोपाळ कृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा गालीत होते मंदिर परिसरात मध्ये मिळेल त्या जागी दाटीवाटीत उभे राहून काल्याचे किर्तन करून वारकरी एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरून गळाभिड घेत होते व कृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद मधून राहायचे वाटप केले जात होते.

त्यावेळी मोठ्या संख्येने उप-स्थित असलेल्या वारकऱ्यांसाठी गोप-ाळपूर ग्रामपंचायतने खास पाण्याच्या टाक्यांकरचे सोय देखील केलेली होती. गोपाळकाल्याच्या उत्साह सुरळीत पार पाडावा यासाठी जिल्हा पोलीस प्रम ुखाच्या मार्गदर्शनाखाली येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खास पोलीस बंदोबस्त ठेवलेला होता.

---



## सुदीप मुनोळी चित्रकला विभागात तालुकास्तरीय प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या लहान गट मुला-मुलींसाठी तालुकास्तरीय टॅलेंट हंट स्पर्धेत चित्रकला प्रकारात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या मैंदर्गी कन्नड मुलांची शाळेची विध्यार्थी सुदीप मुनोळी याला प्रमाणपत्र व पदक देवून सत्कार करण्यात आले.

गुरुवारी अक्कलकोट येथील वरिष्ठ प्राथमिक शाळेत वैयक्तिक स्पर्धेमध्ये चित्रकला, भाषण, कथाकथन, निबंध आणि सामूहिक स्पर्धेमध्ये लोकनृत्य आणि गट गायन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मैंदर्गी कन्नड मुलांची शाळेने समूहनृत्य, समुहगायन व चित्रकला स्पर्धेमध्ये भाग घेतले होते. प्रत्येक विभागामध्ये प्रथम, द्वितीय, त्रितीय तीन क्रमांकांना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षण विस्ताराधिकारी सोमशेखर स्वामी व लक्कप्पा पुजारी यांनी चित्रकला प्रकारात प्रथम क्रमांक मिळविलेल्या सुदीपचा प्रमाणपत्र व पदक देऊन गौरव केला. बीआरसीचे गणेश अंबुरे, शिक्षक शिवानंद गोगाव, अंबाराया उजनी, शिक्षिका संगीता राठोड, भौरम्मा पोमाजी, अश्विनी शंबरगी आदींसह अनेकजण उपस्थित होते. बीईओ प्रशांत अरबाळे, मुख्याध्यापक श्रीशैल हडलगी, मैंदर्गी केंद्रप्रमुख महादेव पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धराम जकापुरे, सुशीलाबाई स्वामी, विजयकुमार गुंडद, संगीता राठोड, राजश्री उप्पीन, अश्विनी शंबरगी, व मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक सदानंद कोळी, रमेश जुजागर, शिवणगी यांनी अभिनंदन केले.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये युवा तरुण आणि अनुभवी चेहऱ्यांना संधी : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

## राष्ट्रवादी अजित पवार गटाची आढावा बैठक, निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रफुल्ल शेवाळे : मुंबईतील वरळी डोम येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जिल्हानिहाय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे ग्रामीण क्षेत्रांतील पक्षीय कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पक्षाला मानणारे लोक आजही आहेत आणि सर्व सामान्य जनता कुणाच्या पाठीशी आहेत हे सगळ्यांनी लक्षात घ्या, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सदर आढावा बैठकी मध्ये केल्या आहेत.




ठाणे ग्रामीण मधील अंबरनाथ आणि बदलापूर येथील नगरपरिषद येथील सध्या ची स्थिती, पक्षाचे स्थानिक वर्चस्व याबाबतची माहित ठाणे ग्रामीण चे प्रभारी अध्यक्ष किसनराव तारमळे यांनी सदर बैठकीम ध्ये सादर केली.

यावेळी उपस्थित बैठकीला म ार्गदर्शन करत महिला बालविकास मंत्री तथा ठाणे जिल्हा संपर्क मंत्री अदिती तटकरे आणि स्थानिक नेत्यांच्या संयुक्त सभा घेऊन आणि पक्षाची सद्य स्थिती, स्थानिक अनुकूल वातावरण या अनुषंगाने युती होण्यासाठी प्रयत्न व्हावेत अशा सूचना केल्या आहेत.

यावेळी उपस्थित बैठकीला मार्गदर्शन करित अजितदादा म्हणा-ले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्शवभूमीवर पक्षाची स्थानिक सद्यस्थिती, संघटनात्मक बांधणी अतिशय महत्तवाची आहे. तसेच आगामी निवडणुकांच्या दृष्टीने राष्ट्रवादी परिवारातील प्रत्येक सदस्याने एकजुटीने काम करून पक्षाची विच-ारधारा, पक्षाने केलेली कामे आणि जनहिताचे धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन हे प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी यांनी यशस्वी रित्या पार पाडावे अशा सुचना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केल्या आहेत .

सगळ्यात महत्तवाचे म्हणजे शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारे वर चालणारा आप-ला पक्ष आहे, हे सगळ्यांनी लक्षात ठेवून आपली पुढील वाटचाल चालू ठेवायची आहे. स्थानिक पातळीवर बेरजेचं राजकारण लक्षात ठेवून पुढील वाटचाल आपणा सगळ्यांना करायची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थे च्या निवडणुकीमध्ये अनेक नवे चेहरे, आणि अनुभवी चेहऱ्याना, तरुणांना विशेष संधी मिळणार आहे असं सूचक विधान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूम ीवर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपापल्या विभागात, परिसरात जोम ाने, उत्साहाने आणि जबाबदारीने काम करून पक्ष अधिक बळकट करावा, आपली पक्षाची ताकद दाखववी,असे आवाहन करण्यात आले.कार्यकर्ते एकटे आहेत असं समजू नका, जोमाने एकदिलाने पुढे चालत राहा, आम्ही आपल्या सोबत आहोत, असं मार्गदर्शन अजितदादा पवार यांनी केले आहे.

या बैठकीदरम्यान पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार, पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. खा. श्री. प्रफुलभाई पटेल आणि प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. सुनीलजी तटकरे यांनी संबंधित भागातील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत, पक्षाची विद्यमान संघटनात्मक रचना, स्थानिक राजकीय परिस्थिती, आव्हाने तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची तयारी आणि धोरणात्मक नियोजन यावर सखोल चर्चा केली. यासोबतच स्थानिक विकासकामे, पक्षविस्तार आणि संघटनात्मक कार्य याबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात आली.

या बैठकीस महिला व बालविकास मंत्री मा. ना. कु. आदितीताई तटकरे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा सौ. रुप-ालीताई चाकणकर, प्रदेश सरचिटणीस तथा कोषाध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव गर्जे, पक्षाचे मुख्य प्रवक्ते मा. श्री. आनंद परांजपे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ठाणे ग्रामीण विभागामधून - ठाणे ग्रा. प्रभारी अध्यक्ष श्री. किसनराव तारमळे,परशुराम आर्थिक विकास महामंडळ चे अध्यक्ष कॅप्टन आशिष दमले, (मंत्री दर्जा ) शह-ापूर विधानसभा आमदार दौलत दरोडा,(अनुसूचित जमाती कल्याण समिती अध्यक्ष - राज्यमंत्री दर्जा ) प्रदेश सरचिटणीस संजय तिवरे,प्रविण खरात प्रदेश चिटणीस डी. के.विशे सर, महिला जिल्हाध्यक्षा सौ. कल्पना तारमळे, युवक जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, जिल्हा सामाजिक न्याय विभाग कमलाकर सूर्यवंशी, ठाणे जिल्हा ग्रामीण मधून प्रशांत हेग-डे, अरुण जाधव, शहापूर अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, कार्यध्यक्ष अरुण मांजे, जितेंद्र तारमळे, भिवंडी अध्यक्ष विजय पाटील, मुरबाड अध्यक्ष चंद्रकांत बोष्टे, कल्याण अध्यक्ष बाळाराम कोर, बदलापूर शहर अध्यक्ष प्रभाकर पाटील, अंबरनाथ शहर अध्यक्ष सदामामा पाटील, कार्याध्यक्ष डी. म ोहन, याचबरोबर ठाणे ग्रामीण मधील तालुक्यातील विविध पदाधिकारी, म हिला पदाधिकारी, फ्रंट सेल चे जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड यांचे कच्च्या कानाचे पुस्तक सुपी सय्यद यांना भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनिधी : जिल्ह्याचे माजी खासदार डॉ.सुनिल बळीराम गायकवाड साहेब, यांनी बरीच पुस्तके लिहीली आहेत.२०पेक्षा जास्त साहित्य प्रकाशित झाले आहेत.

समाज बदलाची जिवंत उदाहरणे त्यांच्या पुस्तकात पाहायला मिळतात. आज महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव तसेच युवा भिम सेनेचे प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन यांना कच्च्या कानाचा ही सत्यकथा,भेट दिली. हे पुस्तक प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींना एक प्रेरणा देणारी आहे.हे पुस्तक वाचताना वाटतं जणू हे आपल्या वरच अधोरेखित केले आहे. सध्या समाजात होणारे वादळ,गृहक्लेश,हे सर्व कच्च्या कानामुळे होत आहेत.घर, राजकारण, समाजकारण अगदी सर्वच क्षेत्रात कामी येणारे असे पुस्तक आहे. यावेळी दैनिक जगमित्र चे लातूर जिल्हा प्रतिनिधी संतोष सोनवणे, सारंग, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# आहुजी कंपनीकडून मंदिर समितीस विद्युत साहित्य व साऊंड सिस्टीम भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर यांच्या वतीने भाविकांच्या सेवेसाठी सतत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर पुणे येथील अनिलभाई भन्स-ाली यांनी आहुजा कंपनीचे विद्युत साहित्य व साउंड सिस्टम, तसेच नितीन वरघडे, पुणे यांनी संगणक साहित्य श्री विठ्ठल चरणी देणगी स्वरूपात अर्पण केले आहे.

ही देणगी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समि तीच्या सदस्य मा. निगडे मॅडम यांच्या उपस्थितीत स्वीकारण्यात आली. या देणगी वस्तूंचा उपयोग मंदिर प्रशासनाच्या कार्यात व भाविकांच्या सेवेसाठी करण्यात येणार आहे.

समितीच्या वतीने दोन्ही देणगीदारांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले असून, त्यांच्या या भक्तिपूर्ण कार्याला श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची कृपा लाभो, अशी शुभेच्छा व्यक्त करण्यात आली आहे.




**- श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर**

# राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्प उभारणीचा ऐतिहासिक टप्पा : सरन्यायाधीश भूषण गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्प उभारणी हा ऐतिहासिक टप्पा आहे. राज्य शास-नाने कायदा शिक्षणासाठी दाखविलेली बांधिलकी उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात न्यायपालिकेच्या पायाभूत सुविधांचा दर्जा देशात सर्वोत्तमांपैकी एक आहे, असे गौरवोद्गार सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सरन्यायाधीश गवई यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाचे प्र-कुलगुरू न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, न्यायमूर्ती भारती डांगरे, न्यायमूर्ती संदीप मर्ने, राज्याचे महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिलीप उके, लोकप्रतिनिधी, अधिकारी, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्या-पीठ प्रकल्पासाठी महाराष्ट्र शास-नाने मौल्यवान जागा उपलब्ध करून



दिल्याचे नमूद करून हा प्रकल्प केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय दर्जाचा ठरेल, असा विश्वास सरन्यायाधीश गवई यांनी व्यक्त केला. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, कायद्याचे शिक्षण हे केवळ व्यवसाय नव्हे, तर समाज परिवर्तनाचे साधन आहे. वकील हे समाज अभियंते आहेत, जे सामाजिक आणि आर्थिक न्याय साकारतात.

महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील विधि शिक्षणाचे केंद्र बनेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र हे तीन राष्ट्रीय विधि विद्या-पीठ असलेले देशातील एकमेव राज्य आहे. मुंबई विद्यापीठाच्या अत्याधुनिक प्रकल्प उभारणीसाठीच्या सर्व परवानग्या पूर्ण झाल्या आहेत. हा प्रकल्प केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील विधि शिक्षणाचे केंद्र बनेल. नवी मुंबईत उभारण्यात येणाऱ्या 'एज्यु-सिटी'मध्ये जगातील सर्वोच्च विद्यापीठे येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

आजच्या काळात उद्योग, व्यवसाय,

**महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्पाचा शुभारंभ**

सामाजिक जीवन आणि राजकारण या सर्व क्षेत्रांचा संबंध शिक्षण क्षेत्राशी घट्ट जोडलेला आहे. आज मानवी संपत्ती ही सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. पूर्वी म नुष्यबळ भांडवलाकडे जात असे, आता भांडवल मनुष्यबळाकडे येते. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वोत्तम मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर म्हणाले, विधि विद्यापीठ हे केवळ शिक्षण देणारे केंद्र नसून, उत्तम नागरिक घडवण्याचे स्थान आहे. शिक्षणाचा उद्देश फक्त ज्ञान मि ळवणे नसून जीवनात उत्कृष्टता आणि मानवी मूल्यांचा विकास साधणे हा आहे. चांगला विद्यार्थी, शिक्षक किंवा नागरिक तोच होऊ शकतो जो प्रथम चांगला माणूस आहे, असे त्यांनी नमूद केले.

कुलगुरू दिलीप उके यांनी स्व-ागत व प्रास्ताविक केले तर कुलसचिव प्रकाश चौधरी यांनी आभार मानले.

## 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महिला : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर केले संशोधन

# सुवर्णा हजारे यांना इतिहास विषयात पीएच.डी पदवी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय, पंढरपूर येथील इतिहास संशोधन केंद्राच्या विद्यार्थिनी सुवर्णा ज्ञानेश्वर हजारे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून इतिहास विषयातील पीएच.डी पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे. त्यांचा संशोधन विषय 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महिला : एक चिकित्सक अभ्यास' असा होता. या संशोधनासाठी त्यांना महाविद्यालयाचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्रो. डॉ. हणमंत लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यापीठात पार पडलेल्या मौखिक परीक्षेच्या अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. संजय गायकवाड हे होते, तर बाह्य परीक्षक म्हणून डी.आर. माने महाविद्यालय, कागल येथील इतिहास विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष जेठेथोर यांनी काम पाहिले. सुवर्णा हजारे यांनी केलेल्या सादरीकरण, विचारमंथन, प्रश्नोत्तरे आणि परीक्षकांच्या अभिप्रायानंतर अध्यक्षांनी त्यांना पीएच.डी पदवी बहाल झाल्याची घोषणा केली.

या मौखिक परीक्षेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोला-पूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, पीएच.डी संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. एम. एस. रोकडे, उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. दत्तात्रय थोरात, प्रा. डॉ. रविराज कांबळे, प्राचार्य डॉ. तानाजी मगर, प्रो. डॉ. सुवर्णा गुंड, प्रा. डॉ. नागिन सर्वगोड, प्रा. डॉ. धनश्री कापशीकर, प्रा. हर्षश्री वाघम ोडे, प्रा. फेमिदा जेठेथोर, प्रा. डॉ. नवनाथ पिसे, प्रा. डॉ. देवेंद्र मदने, प्रा. डॉ. उमेश माने, प्रा. डॉ. अनिल येडगे, डॉ. धनंजय रणदिवे आदींसह चाळीसहून अधिक मान्यवर उप-स्थित होते. मौखिक परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी देवकन्या पांढरे आणि अक्षय सोनवणे यांनी कामकाज पाहिले.

सुवर्णा हजारे यांच्या या यशाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. प्रकाश महानवर, माजी आमदार प्रशांतराव परिचारक, प्राचार्य डॉ. मि लिंद परिचारक, एड. प्रणव परिचारक, प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड, प्राचार्य डॉ. बाळासाहेब बळवंत, प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, प्राचार्य डॉ. उदय जाधव, सरकारी वकील एड. चंद्रकांत सूसलादे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

सुवर्णा हजारे यांच्या संशोधन कार्यासाठी डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. शिवाजी वाघमोडे, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. सुशीलकुमार शिंदे, डॉ. नारायण लोखंडे, डॉ. दिलीप कोने, डॉ. स्वप्निल बुचडे, राजेश बाणदार, एड. अभिमान हाके, रघुराज मेटकरी यांनी विशेष सहकार्य केले.



सुवर्णा हजारे यांनी यापूर्वी इतिहास विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण केली असून त्या उमा महाविद्यालय, पंढरपूर येथील माजी विद्यार्थिनी आ-हेत. त्यांचे पदवी शिक्षण याच म हाविद्यालयातून पूर्ण झाले आहे. त्या तानाजी वाघमोडे यांच्या भाची असून प्रा. डॉ. दत्ता डांगे यांच्या सहचारिणी आहेत.

सुवर्णा हजारे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल पंढरपूर व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.